# उल्हासनगर महानगरपालिका

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४,दिनांक ३ मार्च, २०२२.
२) जा.क्र.उमपा/आ.का./१०२/२०२२, दिनांक १३ जुलै, २०२२ रोजीचा कार्यभार स्वीकृती आदेश.

**विषय :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) यातील तरतुदीनुसार, मालमत्ता कर वसुलीसाठी थकबाकीदारांच्या जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतीची लिलावाने विक्री करणेसाठी नियम ४७ (७) नुसार आयुक्ताच्या वतीने कर निर्धारक व संकलक यास नाममात्र रु. १ किंमतीची बोली बोलून मालमत्ता ताब्यात घेणेकामी प्राधिकृत करणेबाबत.

## प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता करापोटी येणेअसलेली रक्कम महानगरपालिकेस देण्यास कसूर केली आहे. अशा मिळकतीचे कर देण्यास प्रथमतःपात्र व्यक्ती/मालक/धारक/भोगवटाधारकास कराचे बिल बजावण्यात आहे असून, अशा मिळकतीचे कर देण्यास प्रथमतःपात्र व्यक्ती/मालक/धारक/भोगवटाधारक यांनी कराच्या रक्कमा महानगरपालिकेत जमा करणेसाठी नोटीस बजा पत्राने सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतरही कराच्या थकबाकी रक्कमा महानगरपालिकेत जमा न केल्यामुळे, मालमत्ता कराच्या वसुलीसाठी एकूण खालीलप्रमाणे कर देण्यास प्रथमतःपात्र व्यक्ती/मालक/धारक/भोगवटाधारकांच्या स्थावर मालमत्तांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४२ अन्वये जप्ती/अटकावणीचे अधिपत्र काढून स्थावर मिळकतीची जप्ती/अटकावणी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | कर देण्यास प्रथम पात्र असलेले व्यक्तीचे नाव | मिळकतीचा पत्ता | कर आकारणी पुस्तकाप्रमाणे मालमत्ता क्रमांक | बांधकाम प्रकार | अंदाजित क्षेत्रफळ (चौ.फुट) | थकबाकी रक्कम रु | आरक्षित किमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | दयानंद डी शेट्टी | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, दुसरा मजला, शॉप नं. २०८, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५३०० | आरसीसी | ४०२ | रु. १,१९,१०६/- अधिक विलंब शास्ती | रु. २८,६६,६७५/- |
| २ | होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. ३०२, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५६०० | आरसीसी | १७३ | रु. १,७०,९३४/- अधिक विलंब शास्ती | रु. १०,६१,५२९/- |
| ३ | होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. ३०४, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५८०० | आरसीसी | १७५ | रु. ५४,२५७/- अधिक विलंब शास्ती | रु. १०,७३,८०४/- |
| ४ | बुलचंद निहालचंद | प्लॉट नं. २३, विकास नर्सिंग होम समोर, हुकूमतराय अपार्टमेंट, सातवा मजला, फ्लॅट नं. ४० व ४१ उल्हासनगर-३ | २७बीआय००४९२६८०० | आरसीसी | ७४२ | रु. ४,३१,१४०/- अधिक विलंब शास्ती | रु. ३३,६८,२८५/- |
| ५ | होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, पहिला मजला, शॉप नं. १०२, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७३६०० | आरसीसी | २१६ | रु. ६५,६३९/- अधिक विलंब शास्ती | रु. १४,०८,२१३/- |
| ६ | होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. ३०६, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७६००० | आरसीसी | २०९ | रु. ६३,६७९/- अधिक विलंब शास्ती | रु. १२,८२,४२५/- |

२) त्याअनुषंगाने अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४६ अन्वये जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतीची जाहिर लिलावाने विक्री दिनांक २७ मार्च २०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता करणेबाबतची जाहीर लिलावाची नोटीस दि. २१ मार्च २०२३ रोजीचे राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच त्याची प्रत महानगरपालिका संकेतस्थळावर सुध्दा प्रसिध्द करण्यात आली आहे. परंतु दिनांक २७ मार्च २०२३ रोजी व वेळी संबंधित मिळकत विकत घेण्यास अगर बोली बोलण्यास कोणीही आले नाही.

३) तदनंतर पुन्हा जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतीची दुबार जाहिर लिलावाने विक्री दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी सकाळी ११-०० वाजता करणेबाबतची जाहिर लिलावाची नोटीस दिनांक ०४ एप्रिल २०२३ रोजीचे राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय, स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच त्याची प्रत महानगरपालिका संकेतस्थळावर

सुध्दा प्रसिध्द करण्यात आली आहे.परंतु दिनांक १३ एप्रिल २०२३ रोजी व वेळी संबंधित मिळकत विकत घेण्यास अगर बोली बोलण्यास कोणीही आले नाही.

४) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ कराधान नियम यामधील नियम ४७ (७) विक्रीसाठी काढलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, महानगरपालिकेच्या वतीने, आयुक्ताने नाममात्र बोली बोलणे कायदेशिर असेल परंतु अशा रीतीने बोली बोलण्यासाठी स्थायी, समितीची पूर्वमान्यता मिळवण्यात आली पाहिजे, अशी तरतुद आहे.

५) उक्त तरतुदीनुसार सदर मिळकतीची आरक्षित किंमती एवढी बोली, कोणाकडून बोलली न गेल्यास अथवा कोणीही लिलावात भाग न घेतल्यास, अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४७ (७) अन्वये नाममात्र किंमतीची बोली बोलण्यास मा. स्थायी समितीची पुर्व मान्यता आवश्यक आहे.

६) त्याअनुषंगाने वरीलप्रमाणे जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतीची लिलावाने विक्री करतेवळी अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४७(७) नुसार नाममात्र रु. १ किंमतीची बोली बोलून मालमत्ता ताब्यात घेणेकामी आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांस प्राधिकृत करणेसाठी मा. स्थायी समितीपुढे मंजुरीकरिता शिफारस करण्यात येत आहे.

७) दिनांक ०४ एप्रिल २०२२ रोजी महानगरपालिकेची मुदत संपुष्टात आली आहे. दिनांक ०४ एप्रिल २०२२ च्या आदेशान्वये महानगरपालिकेवर प्रशासक म्हणुन मा. आयुक्त यांना नियुक्त केलेले आहे. स्थायी समिती/महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. त्याअनुषंगाने वरीलप्रमाणे जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतीची लिलावाने विक्री करतेवेळी अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४७ नुसार नाममात्र रु. १ किंमतीची बोली बोलून मालमत्ता ताब्यात घेणेकामी आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांस प्राधिकृत करणेसाठी सदर प्रस्ताव मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांचेकडे सादर करणेसाठी मान्यता मिळण्यासाठी प्रस्तावित करण्यात येत आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. - १५** **दिनांक –१९/०५/२०२३**

उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता करापोटी येणेअसलेली रक्कम महानगरपालिकेस देण्यास कसूर केली आहे. अशा मिळकतीचे कर देण्यास प्रथमतःपात्र व्यक्ती/मालक/धारक/भोगवटाधारकास कराचे बिल बजावण्यात आहे असून, अशा मिळकतीचे कर देण्यास प्रथमतःपात्र व्यक्ती/मालक/धारक/भोगवटाधारक यांनी कराच्या रक्कमा महानगरपालिकेत जमा करणेसाठी नोटीस वजा पत्राने सुचना देण्यात आल्या आहेत. त्यानंतरही कराच्या थकबाकी रक्कमा महानगरपालिकेत जमा न केल्यामुळे, मालमत्ता कराच्या वसुलीसाठी एकूण खालीलप्रमाणे कर देण्यास प्रथमतःपात्र व्यक्ती/मालक/धारक/भोगवटाधारकांच्या स्थावर मालमत्तांची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम ४२ अन्वये जप्ती/अटकावणीचे अधिपत्र काढून स्थावर मिळकतीची जप्ती/अटकावणी करण्यात आलेली आहे.

| अ.क्र | कर देण्यास प्रथम पात्र असलेले व्यक्तीचे नाव | मिळकतीचा पत्ता | कर आकारणी पुस्तकाप्रमाणे मालमत्ता क्रमांक | बांधकाम प्रकार | अंदाजित क्षेत्रफळ (चौ.फुट) | थकबाकी रक्कम रु | आरक्षित किमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | २ | ३ | | | | | |
| १ | दयानंद डी शेट्टी | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, दुसरा मजला, शॉप नं. २०८, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५३०० | आरसीसी | ४०२ | रु. १,१९,९०६/- अधिक विलंब शास्ती | रु. २४,६६,६७५/- |
| २ | होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. ३०२, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५६०० | आरसीसी | १७३ | रु. १,७०,९३४/- अधिक विलंब शास्ती | रु. १०,६१,५२९/- |
| ३ | होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. ३०४, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७५८०० | आरसीसी | १७५ | रु. ५४,२५७/- अधिक विलंब शास्ती | रु. १०,७३,८०१/- |
| ४ | बुलचंद निहालचंद | प्लॉट नं. २३, विकास नर्सिंग होम समोर, हुकूमतराय अपार्टमेंट, सातवा मजला, फ्लॅट नं. ४० व ४१ उल्हासनगर-३ | २७बीआय००४९२६८०० | आरसीसी | ७४२ | रु. ४,३१,१४०/- अधिक विलंब शास्ती | रु. ३३,६८,२८५/- |
| ५ | होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, पहिला मजला, शॉप नं. १०२, उल्हासनगर-३ | २७बीओ००८१७३६०० | आरसीसी | २१६ | रु. ६५,६३९/- अधिक विलंब शास्ती | रु. १४,०८,२१३/- |
| ६ | होल्डर | पार्वती प्लाझा, महाराजा हॉल जवळ, कल्याण अंबरनाथ रोड, तिसरा मजला, शॉप नं. | २७बीओ००८१७६००० | आरसीसी | २०९ | रु. ६३,६७२/- अधिक विलंब शास्ती | रु. १२,८२,४२५/- |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १२/०७/२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. अजीज शेख प्रशासक, उल्हासनगर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) यातील तरतुदींनुसार, मालमत्ता कर वसुलीसाठी थकबाकीदारांच्या जप्ती/अटकावणी केलेल्या मिळकतीची लिलावाने विक्री करणेसाठी नियम ४७ (७) नुसार आयुक्ताच्या वतीने कर निर्धारक व संकलक यास नाममात्र रु. १ किंमतीची बोली बोलून मालमत्ता ताब्यात घेणेकामी आयुक्तांच्या वतीने कर निर्धारक व संकलक यांना प्राधिकृत करीत आहे.

वरीलप्रमाणे ठराव मंजूर

( सौ. प्राजक्ता मि. कुलकर्णी )
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

( श्री. अजीज शेख )
प्रशासक
उल्हासनगर महानगरपालिका